म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ४८

# पाडव्याची भेट

# वानप्रस्थाश्रम

लेखक व प्रकाशकः-

3282

गोविंद रंगराव अळेकर.

शुक्रवारी, नागपूर.

REFBK-0003282

चैत्र शुद्ध १ शके १८४९ संवत १९८३,

रोज रविवार तारीख ३ एप्रील १९२७.

REFBK-0003282



# " प्रस्तावना "

अहाहा ! आजचा दिवस किती तरि आनंदाचा ? पांपणी लवते न लवते तोंच एका मागून एक पळेंच्या पळें ज़ाऊन दिवसचे दिवस जसें पळतात तसेंच पळो-पळीं येणारीं संकटेंच काय, तर इतर सर्व प्रकारचे सुख दुःखाचे प्रसंगहि असें कांहीं भरकन् निघून जातात कीं कधीं कधीं तर त्यांच्याबद्दल विचार सुद्धां करण्याकरितां वेळ नसतो. बरं " सुख पाहतां जवा पाडें । दुःख पर्वता एवढें " असें वाटून जर विचार करण्याकरितां वेळ मिळालाच तर " हेहि दिवस निघून जातील " ह्या उक्तींत असलेल्या तत्वाची ज्यांना जाणीव असते त्यांना

असलेली दृष्टोत्पत्तीस पडते कीं त्याबद्दल त्यांना विचारा-वयासच नको. त्यांतल्या त्यांत प्रत्येक प्रसंगीं पहिला दिवस तर त्यांनाच फार आनंदाचा असतो असें नाहीं तर जे अविचारी असतात त्यांना सुद्धां तो पहिला दिवस आनंदाचाच असतो. कारण मागें झालें तें झालें पण आतां पुढें तरि चांगलें झालें पाहिजे असें म्हणून त्या पहिल्या दिवशीं तरी अविचारी मंडळी सुद्धां थोडा वेळ विचारीहि होतातच. म्हणून जन्मकाळीं तर पहिला दिवस सर्वांनाच आनंदाचा असतो. जिवांत असलेली पशुवृत्ति नाहींशी व्हावी ह्या हेतूनें विद्या संपादन करणें जरूरीचें असल्यामुळें अ, आ काढतां येऊं लागल्याबरोबर बाळपणीं मनाला किती तरि आनंद होतो! अशा प्रकारचा होणारा आनंद अज्ञान अवस्थेंत असल्यामुळें तो कसा होतो ह्याचा प्रत्यक्ष असा झालेला अनुभव जरी मोठेपणीं कोणालाहि सांगतां येणें पुढें शक्य नसलें तरी इतर अज्ञान अवस्थेंत असणाऱ्या मुलांना जो आनंद होतो तो स्वाभाविक असल्यामुळें तशा प्रकारचा आनंद प्रत्येकाला झालेला असलाच पाहिजे ह्यांत शंका नाहीं असें

स्थितींत विद्यार्जन व्हावें म्हणून करावीं लागणारीं कर्में करून शेवटीं परिक्षेंत उत्तीर्ण झालें म्हणजे दर वर्षीं पुढील वर्गांत प्रवेश करण्याची वेळ किती तरी आनंदाची असते ? नंतर विद्यार्थी दशा म्हणजे ब्रम्हचर्याश्रम संपून पुढील गृहस्थाश्रमांत प्रवेश करण्याचो वेळ आली म्हणजे पहिला दिवस किती तरी आनंदाचा असतो; आणि गृहस्थाश्रम संपून पुढील आश्रमांत प्रवेश करण्याची वेळ आली म्हणजे मनाला जो आनंद होतो तो तर विचारावयासच नको ! जगांत वावरतांना चारीहि आश्रमांत श्रेष्ठ असलेल्या अशा गृहस्थाश्रमांतील गृहस्थावरच इतर तिन्हीहि आश्रमांची जबाबदारी असल्यामुळें आणि जगाची वाढहि गृहामुळें होते म्हणून जगाची वाढ त्याच आश्रमांत असतांना होत असल्यामुळें गृहस्थाश्रम संपण्याची वेळ ह्मणजे ऐन दुपारच्या बारा वाजण्यांच्या वेळेप्रमाणेंच महत्वाची असते. गृहस्थाश्रम चांगला झालेला असला तर ही बाराची वेळ चांगली जाते, पण जर कां गृहस्थाश्रमांत असतांना थोडीशीहि चूक झाली तर त्या चुकीच्या मानानें ती बाराची वेळ सुद्धां अशी भार घालूं नये. फार काय तर ते जेव्हां एखाद्या सार्वजनिक कार्याकरितां वर्गणी जमा करीत तेव्हां त्या

वाजतात कीं त्यावेळीं अगदीं दिवाळखोराप्रमाणें स्थिति प्राप्त होऊन पुढे पुरें दिवाळेंच वाजतें. म्हणून गृहस्थाश्रम संपण्याची वेळ फारच महत्वाची आणि ही वेळ चांगली साधली म्हणून मनाला किती तरी आनंद होत आहे! एक तर पुढील आश्रमांत प्रवेश करण्याची वेळ तारीख १६।१०।२६ रोजीं म्हणजे विजया दशमीच्याच सुमुहूर्तावर येऊन त्या नवीन आश्रमांतील आजचीच पहिली वर्ष प्रतिपदा म्हणून आनंद आणि त्यांत मागील आश्रम चांगला साधला म्हणून त्यामुळें झालेल्या आनंदाची भर पडली आणि पुढील आश्रमांत जें कार्य करावयाचें त्या कार्यानिमित्तहि आजच बारावा लेख लिहिण्याचा सुप्रसंग आला आणि साठ संवत्सरापैकीं शेवटचेंच क्षय नाम संवत्सर संपून आजच पुन्हां पहिल्या प्रभव नाम संवत्सराचा प्रारंभ झालेला. मग काय पहावयाचें! आजचा दिवस किती तरी आनंदाचा! आणि अशा आनंदाच्या प्रसंगीं जर कोणाचें स्मरण होत असेल तर तें स्मरण करीत असतांना कै. माधवरावजी सप्रे ह्यांच्या सारख्या संताचे स्मरण प्रथम झाल्याशिवाय कसें राहील?

आज जो व्हावयाचा तोच कार्यारंभहि त्या संताच्या समागमामुळें सात वर्षांपूर्वींच घडून आला. म्हणून त्या संताचें स्मरण झालें म्हणजे मनाला किती तरी आनंद होतो ! त्या संताची माहिती जनतेला पूर्वीपासूनच असल्यामुळें त्यांचें चरित्र ह्या प्रसंगीं पुन्हां सांगण्याची जरी जरूरी नसली तरी त्यांच्या संबंधानें एक महत्वाची गोष्ट सांगावीशी वाटते कीं ते मोठे कर्मवीर होते. कारण लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्याचें हिंदी भाषेंत भाषांतर करूनच त्यांनीं आपणांस कर्मवीर म्हणवून घेतलें असें नाहीं तर त्यांची राहणीहि अगदी कर्मवीरा-प्रमाणें इतकी होती कीं ते स्वार्थाकरितां सुद्धां कर्म केल्या शिवाय कोणत्याहि मदतीची अपेक्षा कधींच करीत नसत. म्हणूनच माधवरावजींना कोणत्याहि मनुष्यापुढें केव्हांहि हात पसरण्याचें काम पडत नसून उलट त्यांनीं प्रवचनें सांगावींत तेव्हां देणाऱ्यांनींच त्यांच्यापुढें उभे राहून हात जोडावेत. त्यांनीं भिक्षा तर मागूंच नये इतकेंच नाहीं तर त्यांच्या करितां वर्गणी सुद्धां गोळा करण्याकरितां कधींहि त्यांनीं कोणालाहि सांगून त्यांच्यावर भार घालूं नये. फार काय तर ते जेव्हां एखाद्या सार्व-जनिक कार्याकरितां वर्गणी जमा करीत तेव्हां त्या

वर्गणींतून स्वतःकरितां कधींहि एक पै सुद्धां न घेतां उलट प्रवचनें सांगून स्वकष्टार्जित पैशांतूनच ते त्या वर्गणींत भर घालीत. त्या योगें त्यांचा तो स्वार्थत्याग असा कांहीं परमार्थ होत असें कीं त्यांच्या कडून होणारीं सार्वजनिक कामें नेहमी उत्तम रीतीनें पार पडत आणि ते जेथें जातील त्या ठिकाणींहि त्यांचें वजन मोठमोठ्या श्रीमंत मंडळींत सुद्धां चांगलें पडे. म्हणूनच दुसऱ्यांच्या तोंडाकडे पाहून स्वार्थाकरितां त्यांच्या मदतीची अपेक्षा कधींहि न करीत राहतां स्वतःच कष्ट सोसून ज्यांत प्राविण्य मिळविलें असेल त्याला अनुरूप अशा कर्माच्या द्वारें स्वार्थ साधल्यानंतर त्या स्वार्थापैकीं जितका स्वार्थत्याग करतां येईल तितका स्वार्थत्याग स्वातंत्र्यांत करणारे जे कर्मवीर जगांत वावरतात त्या पैकींच माधवरावजी सप्रे हेहि एक होते ह्यांत संशय नाहीं. फार काय तर जेव्हां त्यांना स्वार्थाकरितां पैसा लागे तेव्हां त्रास होतो असें कधींहि न म्हणतां आणि कोणी मदत करीत नाहीं त्याला काय करावें, असें म्हणून कोणापुढें रडकें तोंड करून याचना न करतां ते एकदम कर्मच करावयास लागत. आणि जितक्या उत्साहानें ते हजारो मनुष्यांत आपलें प्रवचन जोरानें

सांगत तितक्याच जोरानें आणि उत्साहाने चार मनुष्यां-नाहि ते प्रवचन सांगत आणि त्या योगें त्यांना कधींहि कमी पडत नसें. मग अशा स्वार्थत्याग करणाऱ्या कर्मवीराचा थोडा वेळ जरी समागम घडण्याचा योग आला तरी तो व्यर्थ कसा जाणार? बारा वर्षांहूनहि जास्त असे बरेच दिवस जबलपूर मुक्कामीं राहण्याचा प्रसंग आल्यामुळें तेथून जवळच असलेल्या नर्मदेवरील भेडाघाटीं असलेले संगमरवरी दगडाचे खडक ( Marble Rocks ) निरनिराळ्या मंडळीबरोबर पाहाण्याचे योग कित्येकदां आले; पण प्रत्येक प्रसंगीं तें ठिकाण पाहाणें झाल्यानंतर तेथें स्नान करून नंतर परत घरीं यावें एवढेंच काय तें. पण जेव्हां एके दिवशीं माधवरावजी बरोबर जाण्याचा योग आला तेव्हांचा प्रसंग असा कांहीं चमत्कारिक घडून आला कीं पूर्वी कधींहि स्वप्नांत सुद्धां न आलेले अथवा मनीं मानसीं नसलेले असे विचार एकाएकीं मनांत आले. काय तो देखावा? किती तरि भव्य आणि चित्ताकर्षक? ज्या ठिकाणीं खडकांतून नाव चालत होती त्या ठिकाणीं दोन्हीहि बाजूस असलेली संगमरवरी खडकाची दरड किती तरी उंचच उंच असून अगदीं सरळच सरळ आणि मधोमध

खोलच खोल असा डोह असून त्यांत एके ठिकाणीं तर एक लहानसेंच बेट आणि त्या ठिकाणापासून थोडेंच अंतरावर वरील अंगास मनाला थक्क करून सोडणारें असें धबधब्याचें ठिकाण. हे प्रकार पाहून एकदम मनांत विचार आला कीं त्या ठिकाणीं पाण्याचा प्रवाह नैसर्गिक नसून तेथें कोणाचें तरी तें अचाट कृत्य आहे. आणि असा विचार मनांत येतो न येतो तोंच जवळच असलेल्या घाटावर स्नान करींत असणाऱ्या मंडळीकडून होणारा "हर नर्मदे, हर, हर, महादेव" असा जय घोषाचा ध्वनि कानीं पडला. मग काय? पावसाळ्यांत आकाशांतून जमिनीवर पडणारें पाणी उताराच्या बाजूनें दऱ्याखोऱ्यांतून वाहत जाऊन शेवटीं ते प्रवाह समुद्रास जाऊन मिळतात म्हणून असे पाण्याचे प्रवाह आणि तळींहि नैसर्गिक आहेत हें आधिभौतिक शास्त्रज्ञांचें म्हणणें शाळेंत शिकविलें गेलेलें असल्यामुळें जरी सर्वांना माहीत असलें तरी हल्लीं इरिगेशन खात्याकडून बांधली जाणारीं तळीं आणि पाण्याचे प्रवाह पाहून कोणत्या ठिकाणीं कर्तृत्व आहे ह्याचीहि जाणीव होत असल्यामुळें आणि "भगिरथें आणिली भागिरथी" ह्याची त्याच वेळीं आठवण झाल्यामुळें त्या प्रवाहाला नर्मदेचें

नांव काय म्हणून हा विचार एकदम मनांत आला. झालें, त्यावेळीं मनांत जितके विचार आले ते सर्व लागलीच माधवरावजींना तेथल्या तेथेंच सांगितले. तेव्हां त्यांनींहि अशीच इच्छा प्रदर्शित केली कीं ते सर्व मनांत आलेले विचार मी जसेच्या तसेच लेखाच्या द्वारें सुज्ञ मंडळीपुढें विचाराकरितां ठेवावे. त्याप्रमाणें लेख लिहिण्याचें टरलें. पण लेख कसा लिहावा हें माहीत नाहीं. कारण त्यावेळे-पर्यंत सगळें आयुष्य अशा कांहीं वातावरणांत गेलेलें कीं मराठी वाङमयाशीं तर अगदी फारकतच झालेली. तरी पण माधवरावजींनीं सांगितलें कीं बोलत्या चालू भाषेंतच लेख लिहिला तरी चालेल. भिण्याचें कारण नाहीं. कारण जगांत वावरणारी सुज्ञ मंडळी समर्थ आहेत आणि कोणाचा लेख कसा असावा, ह्याची त्यांना जाणीव आहे. फार झालें तर जनतेचें मनोरंजन करणाऱ्या भाषे-सारखी भाषा त्या लेखांत येणार नाहीं तरी तो लेख कादंबरीवजा अगर नाटकवजा नसल्यामुळें त्यालाहि हरकत नाहीं. आणि जाणून बुजूनच ज्याचा लेखन-व्यवसाय नाहीं अशा माणसाकडून तो लेख लिहिला गेलेला आहे हें माहीत असल्यानंतर अशा लेखाला जगांत वावरणारे तरी कधींहि आक्षेप न घेतां उलट ते

त्याला प्रोत्साहनच दिल्याशिवाय राहणार नाहींत खास. मग सुज्ञ मंडळीच काय, तर लेखनव्यवसायांत असणारी इतर मंडळी सुद्धां भाषेवरच टीका न करतां लेखांत जे विचार असतील त्याचाच विचार केल्या शिवाय ते कसें राहणार? म्हणून जगांत वावरतांना आपले जे विचार असतील ते सरळ रीतीनें सुज्ञ मंडळीपुढें सादर करीत असतांना प्रथम मनांत असलेली भीति सोडावी हें माधवरावजींनीं अशा कांहीं प्रकारें मनांत ठसवून दिलें कीं मी लागलीच लेख लिहिण्याचा निश्चय केला. अशा प्रकारें लेख लिहिण्यास सुरुवात होऊन त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें पहिला लेख लिहून सूज्ञ मंडळीपुढें जेव्हां सादर केला तेव्हां त्यांनींहि मधुर हास्य करून असे कांहीं प्रोत्साहन दिलें कीं त्या वेळेपासून जी लेखमाला सुरू झाली ती पुढें चालूंच राहिली आणि लेखाकरितां विषय आले ते जसें ओघानें आले तसेंच ते घेतलेहि गेले. कांहीं मंडळींना गृहस्थाश्रमावर लेख लिहिल्यानंतर ब्रम्हचर्याश्रमावर लेख लिहिणें ओघानेंच आलें असें माझें म्हणणें पटलें नाहीं. म्हणून त्यासंबधानें येथें खुलासा करणें जरूरीचें आहे. जग आणि जगाची वाढ ह्या विषयावर लेख लिहिल्यानंतर जगाची वाढ गृहामुळें

होत असल्यामुळें गृह आणि गृहस्थ ह्या विषयावर लेख लिहून पुढें गृहस्थाश्रमावर लेख लिहिला म्हणून अशा गृहस्थाश्रमाकरितां ब्रम्हचर्याश्रम कसा पाहिजे ह्याचा विचार करणें ओघानेंच आले तर त्यांत काय झालें? "आधी कळस मग पाया रे" असें वाटून कोणाला हें चमत्कारीक वाटेल पण कळसाचा अंदाज प्रथम ठरविल्या-शिवाय पाया कसा असावा, हेंहि पक्कें कां ठरवितां येत नाहीं, ह्यांतील मर्म ज्यांना समजेल त्यांना त्याचें आश्चर्यहि वाटणार नाहीं. कारण कळसाचा विचार प्रथम न करतां जर प्रथम पाया तयार करावा तर तो पाया पुढें एक तर लहान व्हावयाचा अथवा कधीं कधीं असा कांहीं मोठा होऊन जावयाचा कीं तो पुढें कळसाच्या मानानें व्यर्थच मोठा ठरावयाचा, इतकेंच नाहीं तर पाया मजबूत पाहिजे असें म्हणून त्याच्यावरच अशी कांहीं मेहनत व्हावयाची कीं पायाच नेहमीं करीत राहावयाचें आणि कळसाचें नांव सुद्धां काढण्यास कधीं पुढें वेळ न यावयाची. असा घोंटाळा होऊं नये म्हणून चारीहि आश्रमांत श्रेष्ठ असलेल्या अशा गृहस्थाश्रमाचा प्रथम विचार करून त्या आश्रमाला योग्य असा ब्रम्हचर्याश्रम कसा असावा, ह्याचा मी नंतर विचार केला आणि अशा

प्रकारें गृहस्थाश्रमाच्या पूर्वी काय तर ब्रम्हचर्याश्रम म्हणून जसा विचार केला त्याच प्रमाणें पुढें काय तर वान-प्रस्थाश्रम म्हणून वानप्रस्थाश्रमावर लेख लिहिणें पुढें ओघानेंच येत आहे. असा खुलासा केल्यानंतर गृहस्थाश्रमावर लेख लिहिल्यानंतर ब्रम्हचर्याश्रमावर लेख लिहिणें ओघानेंच येऊन आतां पुढें वानप्रस्थाश्रमावर लेख लिहिणें कसें ओघानेंच येत आहे हें कोणालाहि समजणें कठीण पडेल असें मला वाटत नाहीं. अशा प्रकारें सुरू झालेल्या लेखमालेचा बारावा लेख लिहि-ण्याचाहि आज सुप्रसंग आला आणि ज्या विषयावर लेख लिहावयाचा तो विषयहि ठरला. मागील आठ वर्षांत एकंदर जे अकरा लेख लिहिले गेले त्या प्रसंगीं गृहस्थाश्रमांतील कर्मे करावयाचीं असत म्हणून लेख लिहिण्याकरितां सुट्टीचेच दिवस काय ते मोकळे सापडत असत. तरी पण कसेंबसें निभलें आणि त्या अवधींत कोणत्याहि प्रकारच्या अडचणी न येतां लेख लिहिले गेले आणि गृहस्थाश्रम संपून पुढील आश्रमांत प्रवेश करण्याच्या ऐन प्रसंगीं त्या नवीन आश्रमाला योग्य असाच विषयहि ओघानेंच येऊन तो लेखहि बारावा आला म्हणून आज नेहमीपेक्षां किती तरी जास्त

आनंद होत आहे. अशा प्रकारें शुभशकुनाची वेळ बाराची साधल्यानंतर मग भीति कसली ? आणि भीति नाहींशी होत जाण्यास सुरुवातहि अगोदरच झालेली असल्यामुळें मग काय पाहावयाचें ! जशी काय साखरच दुधांत पडून राहिलेली आहे ! खरंच. माधवरावजींच्या म्हणण्याप्रमाणें जगांत सुज्ञ मंडळी आहेत ह्याची वेळोवेळीं जसजशी प्रचीति येत गेली तसतशी जगांत वावरतांना वाटणारीहि भीति नाहींशीच होत चालली. गतवर्षी प्रसिद्ध केलेल्या ब्रम्हचर्याश्रमावरील लेखावर जे अभिप्राय आले ते पाहून तर असेंच अनुभवास आलें कीं सुज्ञ मंडळी जगांत धन्य आहेत ह्यांत संशय नाहीं. लेख लिहिल्यानंतर प्रसिद्ध करण्यापूर्वी कांहीं सुज्ञ मंडळी कडून तो लेख वाचून घ्यावयाचा असा माझा सांप्रदाय असल्यामुळें तसें करीत असताना एका सुज्ञानी तर लेख वाचल्याबरोबर जो श्लोक म्हणून दाखविला त्याची सुद्धां प्रचीति किती तरी लौकर आली ! फार काय तर तो श्लोक मला दाखवावा म्हणून त्यांनीं एक पुस्तक उघडून पाहिलें तर जें पान निघालें त्यांतच तो श्लोक पाहून मला तर आनंद झालाच, पण त्यांना सुद्धां हा फारच विलक्षण योगायोग म्हणून आनंद झाला.

घिसाडघाई करणाऱ्या टिकाकारांना तरी हा श्लोक उत्तरादाखल आहे ह्यांत संशय नाहीं. माझ्या लेखांत जे विचार असतात त्यांत कांहीं ठिकाणीं नाविन्य असल्यामुळें तें विचार प्रथम दर्शनीं कसेसेंच वाटतात म्हणून काय झालें? टीका करण्याची घिसाडघाई तरी काय म्हणून? पण ज्यांचें मन इतकें चंचल असतें कीं तें त्यांना मुद्दां आवरतां येणें शक्य नसतें; मग इतरांना त्यांचें मन कसें आवरतां येणार! अशा टीकाकारांना एकच उत्तर कीं त्यांनीं त्या श्लोकाकडे लक्ष द्यावें! हाच तो श्लोक!

" येनाम केचिदिहनः प्रथयंत्यवज्ञां,
जानंतु ते किमपितान् प्रतिनैष्य यत्नः।
उत्पत्स्यतेऽस्ति ममकोऽपि समान धर्मा,
कालोह्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी ॥ "


ह्या श्लोकांत जें म्हटलेलें आहे त्यांची प्रचीति मला तरी निदान फारच लौकर आली असें म्हटल्याशिवाय माझ्यानें तरी राहवत नाहीं. कारण मी तारीख २६ जुन १९१८ रोजीं " नद्या व तळीं ह्या विषयावर जो पहिला लेख लिहिला त्या लेखांत जे विचार सांगितले ते त्यावेळीं नाविन्यामुळें इतरांना जरी कसेंसेच वाटलें तरी आज आठवर्षांनंतर तशाच प्रकारचे उद्गार एके ठिकाणीं दृष्टांत

म्हणून देतांना एका अधिकारी पुरुषाच्या तोंडून निघालेलें ऐकिले म्हणजे मी जे पूर्वी म्हटलें त्याबद्दल आतां कोणालाहि आश्चर्य वाटणार नाहीं. ते उद्गार असेंच ना, कीं " पावसाळ्यांत पर्वताच्या उंच कड्यावरून खाली धांव घेणाऱ्या ओढ्याचें पाणी जोरानें खाली आदळून चहुंकडे पसरतें व कोणाच्याही उपयोगी न पडतां चहुंकडे नासधूस करून शेवटीं व्यर्थ नाहींसें होते; परंतु तोच प्रवाह एक पाट काढून योग्य तऱ्हेनें वळविला, तर त्याचा मनुष्यास हवा तसा उपयोग करून घेतां येतो. " ज्यांनीं माझ्या म्हणण्यावर पूर्वी टीका केली आणि अजूनहि जे टीका करीत आहेत ते जर वरील उद्गाराकडे लक्ष देतील तर त्यांना नाहीं कां असें वाटणार, कीं त्यांच्याकडून होत असणाऱ्या टिकेंत घिसाडघाईच होत आहे! वरील उद्गार कोणाच्या तोंडातून निघालेले आहेत हे टिकाकारांना सांगण्याची जरूरी नाहीं. कारण टिकाकार वाचक असल्यामुळें ते त्यांच्या लक्षांत सहज येण्यासारखें आहे. आणि ज्यांच्या तें लक्षांत येत नसेल ते मग टिकाकार तरी कसले! कारण जे वाचक नाहींत त्यांना टिकाकार म्हणवून घेण्याचा हक्क तरी कसा असणार? तरी पण ज्यांना वर्तमानपत्रें वाचण्याचा कंटाळाच असेल आणि

ज्यांना सहजासहजींच माझा लेख वाचण्यांत आल्यामुळें जर त्या पुरुषाचें नांव ऐकण्याची इच्छा असेल तर त्यांनीं मला तसें कळविल्यास मी त्यांना तें नांवहि कळविल्या-शिवाय राहणार नाहीं. असो. मला तरी आपला पहिला लेख लिहिल्यानंतर ज्यांचा माझ्या लेखाशीं कांहीं एक संबंध नाहीं अशा पुरुषाकडून निघालेल्या उद्गारांत आणि आठ वर्षांपूर्वीं मी जे विचार प्रदर्शित केलेले आहेत त्या विचारांत किती जवळ जवळ एक वाक्यता आहे हें पाहिलें म्हणजे तशी वेळ येण्याकरितां जर मला आठ वर्षें लागलीं तर इतरहि विचारांचा अनुभव येण्याकरितां पुढें किती वाट पाहावी लागेल कोण जाणें ? तरी पण हा शास्त्रिय प्रगतिचा काळ असल्यामुळें कल्पनेच्या भरंवशावरच असणारे कांहीं सिद्धांत जरी आज शास्त्रिय शोधाच्या नांवाखालीं खपत असले तरी तसें काल्पनिक म्हणण फार दिवस टिकून न राहतां खरा शास्त्रिय शोध लागून सत्य काय आहे, हें प्रचितीस येण्यास फार दिवस लागणार नाहींत खास. निदान पृथ्वी फिरते अशी केलेली कल्पना चुकीची ठरून ती अचल असल्याचेंच शेवटीं ठरेल आणि पृथ्वीला जे अचला म्हटलेले आहे त्याला केव्हांहि हरताळ लागणार नाहीं

खास. असो. आपणांस जरी सर्व शास्त्रिय शोधांचे अनुभव येण्याचे प्रसंग आयुर्मर्यादेमुळें न लाभले तरी इतरांना ते पुढें लाभणार नाहींत असें नाहीं. मग मनांत जे विचार येतात ते जसेच्या तसेच सूज्ञ मंडळीपुढें सादर करण्यांत भीति कसली ? म्हणूनच सूज्ञ मंडळींनीं दिलेलें प्रोत्साहन पाहून त्यांनीं जसा आतां पर्यंत माझ्या लेखाचा विचार केला त्याचप्रमाणें पुढील लेखाचाहि त्यांनीं तसाच विचार करावा अशी त्यांची नम्रपणें प्रार्थना करणें हीच माझ्या लेखाची प्रस्तावना असल्यामुळें मी माझ्या नियोजित लेखाची ही प्रस्तावना येथेंच संपवून ज्या सात्विक गुणाचा अंश वाढीस लावल्यामुळें सुज्ञ मंडळी जगांत धन्य आहेत तो सात्विक गुण ज्याचा आहे त्या ईश्वराची प्रार्थना करणें ओघानेंच येत असल्यामुळें प्रस्तावने नंतर ईश्वराचीहि प्रार्थना करण्याची परवानगी घेतों.

श्री



# "ईश्वरप्रार्थना"

जोंपर्यंत आईबापापासूनच मुलांचा जन्म होतांना आणि एकाच बीपासून एकच झाड निघून त्या झाडाला पुष्कळशीं फळें लागतांना आणि कधीं कधीं तर एकाच फळांत अनेक बिया असतांना दृष्टोत्पत्तीस पडत आहेत तोंपर्यंत आईबापांचा आईबाप आणि जगत्कर्ता असा मूळ पुरुष प्रथम एकच असला पाहिजे हें जगांत वावरणाऱ्यांना तरि पटल्याशिवाय राहत नाहीं. आणि तें पूर्णपणें पटतें म्हणूनच त्या मूळ पुरुषाला ते ईश्वर असें म्हणतातहि. जे निरनिराळे प्रकार जगांत चालले आहेत ते पाहून ईश्वराचें अस्तित्व सनातन आहे असेंहि ते म्हणतातच. तरि पण ईश्वर सनातन असूनहि ज्यांना तो दिसत नाहीं ते त्याचें अस्तित्व नाकबूल करून जगांत नास्तिक म्हणून असतातच. खरंच. ईश्वर सनातन

असल्यामुळें जर अजरामर आहे तर तो सर्वांना वाटेल त्यावेळीं आणि वाटेल त्या ठिकाणीं नेहमीं दिसलाच पाहिजे हें अगदीं खरं. पण त्या बरोबर हेंहि खरं नाहीं कां, कीं ज्या अर्थी प्रत्येक जिवांत सत्व, रज आणि तम हे तिन्हीगुण आहेत त्याअर्थीं जसा ईश्वराच्या सात्विक गुणाचा अंश प्रत्येक जिवांत आहे त्याच प्रमाणें रजोगुण व तमोगुण ह्यांचाहि प्रभाव प्रत्येक जिवावर पडलेला असल्यामुळें ते प्रभाव ज्यांच्यामुळें पडलेले आहेत ती रजोगुणी लक्ष्मी आणि तो तमोगुणी शेषहि ईश्वराच्या जवळ असून तेंहि सनातनच आहेत. आणि म्हणूनच ईश्वराला जर पहावयाचे असेल तर सात्विक गुणाचीच वाढ केली गेली पाहिजे ? होय; हेंहि अगदीं खरं. कारण ज्यांनीं ईश्वराप्रमाणेंच तमोगुणाची मात्रा चालूं दिली नाहीं आणि रजोगुणी लक्ष्मीला सेवा करावयास लाविलें त्यांना ईश्वराचें दर्शनहि झालेलेंच आहे. श्रीसमर्थ रामदास स्वामींना ईश्वराचें दर्शन झालेलें आहे. श्री तुकाराम महाराजांना ईश्वराच्या अस्तित्वाचा पदोपदीं अनुभव आलेला आहे त्याच प्रमाणें बऱ्याचशा भगवत् भक्तांना अनुभव आलेला असल्याचेंहि त्यांनीं सांगितलेलें आहे आणि हल्लींहि असें भगवत् भक्त सांगतहि आहेतच. मग

ज्यांना ईश्वराचें अस्तित्व नाकबूल असतें ते एक तर रजोगुणी लक्ष्मीच्या सपाट्यांत सांपडून रजोगुणाचीच फक्त वाढ करणारे असले पाहिजेत अथवा तमोगुणी शेषाच्या सपाट्यांत सांपडून तमोगुणांचीच फक्त वाढ करणारे तरी ते असले पाहिजेत ह्यांत संशय नाहीं. खरंच जे नास्तिक असतात ते बव्हंशीं असेच असतात. रजोगुणी लक्ष्मीच्या सपाट्यांत जे सांपडलेले असतात त्यांचें सगळें लक्ष लक्ष्मीकडे इतकें कांहीं असतें कीं त्यांना प्रत्यक्ष खण-खण आवाज करणाऱ्या लक्ष्मी शिवाय दुसरें तिसरें कांहीं एक दिसत नाहीं तरी अशा नास्तिकांच्या तोंडातून ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल बोलतांना शिव्या तरि निघत नाहींत. परंतु जे तमोगुणी शेषाच्या तडाख्यांत सांपडतात त्यांच्या समोर ईश्वराचें नांव काढिलें कीं त्यांच्या अंगाची जी लाही होते त्या योगें त्यांचा थैनाच सुरू होऊन त्यांच्या तोंडातून तर अपशब्दांचाच भडिमार सारखा चालू होतो. पण काय! तशा प्रकारच्या वर्तनानें आणि नकारार्थी प्रयोगानें ईश्वराच्या अस्तित्वाला बाध न येतां तें उलट दुणावत जातें आणि त्यांची जर एखाद्या भगवत भक्ताशीं गांठ पडली तर त्यांच्या समोर ते शेषाप्रमाणें शेवटीं आपली मान सुद्धां

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३१
3212

डोलवूं लागतातच. ह्मणूनच बहुजन समाज ईश्वराचें अस्तित्व मानितात आणि त्याचे गुण अतिशय प्रेमानें गातात. अग्नि आहे परंतु काष्ठादिक उपाधीशिवाय तो दिसत नाहीं. त्याच प्रमाणें ईश्वर सर्वगुणसंपन्न आहे परंतु त्याचे गुण त्यानें रामकृष्णादिक अवताररूपीं शरीरोपाधीनें जनतेला दाखविलें तेव्हांच कळले. म्हणून ज्यांना अग्नीचे गुण पाहिजेत त्यांनीं काष्ठांची अथवा तेल वातीची योजना करून अग्नीचे गुण जसें पाहावेत त्याच प्रमाणें ज्यांना ईश्वराचें गुण कळावें अशी इच्छा असते ते रामकृष्णादिक अवतार मूर्ती करून मनानें मूर्तीप्रमाणें त्याचें ध्यान आणि मानसपूजा करण्याचा नेम ठेवितात तेव्हां ईश्वराचे गुण त्यांना कळतात. मूर्तिपुजेमुळें मानसपूजाहि किती तरि उत्तम प्रकारें घडतें. एखाद्या तीर्थ क्षेत्रांत अथवा गावांत जावें ह्मणजे त्याठिकाणीं असलेल्या मूर्ति दगडाच्या जरी असल्या तरी त्या प्रतिमेचें पूजन घडल्यानंतर यात्रेकरू जेव्हां घरीं परत येतात तेव्हां हजारों मैल सुद्धां अंतरावर असलेल्या क्षेत्राचें महत्व सांगताना दगडाच्या प्रतिमेसारखे त्यांना जे मनोमय स्मरण होतें तें स्मरणरूपीं मानसिक ध्यान दगड नसून ती मनोमय आकृतीची मानासिक पूजाच असते. म्हणून

मूर्तिपूजेपासून किती तरी फायदा होतो ? पूजा करीत असतांना फुलें वाहणाऱ्या चालीपासून सुद्धां किती तरि फायदा होतो ? एक प्रतिमापूजक आहे तो, आणि एक दोन प्रतिमाद्वेषी आहेत ते दुसरीं, असे मिळून एका सुंदर बागेंतून चालले असतांना पूजकांच्या मनांत येते कीं फुलें पूजेकरितां चांगलीं आहेत म्हणून घरीं न्यावींत आणि ती रमणीय जागाहि त्याला मानसिक पूजेकरितां अत्युत्तम वाटतें. पण जे प्रतिमाद्वेषी आहेत त्यांना तोच बाग पाहून विषयवासना उत्पन्न होते आणि त्यांच्या मनांत येतें कीं पत्नीच्या डोक्यावरील असलेल्या बुचड्याकरितां लागणारा गजरा उत्तम होईल ह्मणून फुलें घरीं न्यावींत आणि जागा तर विषय वासना तृप्त होण्याकरितां अत्युत्तम म्हणून नाच, गाणें, तमाशे वगैरे करण्याकरितां तर फारच योग्य आहे असें त्यांना वाटतें. ह्मणूनच जगांत मूर्तिपूजेला मोठी मान्यता आहे आणि जगांत वावरणारेहि कोणत्याना कोणत्या तरी प्रकारें मूर्तिपूजा करितातच; मग प्रतिमेचा द्वेष करणारे कांहींहि ह्मणोत ! खरं पाहिलं असतांना जीव मूर्तीच असल्यामुळें आणि आदर अथवा सेवा करणें ह्मणजे त्यायोगें पूजाच होत असल्यामुळें नास्तिक जेव्हां एकमेकांचा आदर ठेवितात आणि

सेवा करितात तेव्हां त्यांच्याकडून मूर्तिपूजाच घडते. आणि हीच मूर्तिपूजेची पहिली पायरी असते. जगांत कर्मयोगाला विशेष महत्व असल्यामुळें कर्म करण्यांत जे श्रेष्ठ असतात त्यांचा इतर मंडळीं कडून गौरवच होत जातो तेव्हां तर त्यांचा जो आदर ठेविला जातो त्यायोगें सुद्धां जी मूर्तिपूजा घडते ती मूर्तिपूजेची दुसरी पायरीच असते. कर्मवीरांचें श्रेष्ठत्व ज्यामानानें वाढत्या प्रमाणांत असतें त्याच मानानें त्यांचा आदर ठेवणें वाढत्या प्रमाणांत असतें, तेव्हां त्यांचें स्मरण त्यांच्या पश्चात् राहावें म्हणून त्यांचें छायाचित्र घेऊन त्या छायाचित्राचा आदर त्यांच्या योग्यतेप्रमाणेंच केला जातो आणि अशा प्रकारें छायाचित्रद्वारें होणारा आदर मूर्तिपूजेची तिसरी पायरी असते. पुढें छायाचित्र खराब होण्याचा संभव असतो म्हणून दगडाची मूर्ती करून पुतळा जेव्हां उभारला जातो तेव्हां त्या दगडाच्या मूर्तीची सार्वजनिक-रित्या जो आदर ठेविला जातो त्यायोगें मूर्तिपूजाच घडते आणि ती मूर्तिपूजेची चौथी पायरी असते. ज्याची प्रतिमा असते तो ज्या मानानें पवित्र असतो त्याच मानानें पवित्र्यांत त्यांचे पूजन जेव्हां केलें जातें तेव्हां त्याठिकाणीं भ्रष्टाकार न होईल अशीच खबरदारी घेतली

जाते आणि म्हणूनच अशी सोवळ्यांत केली जाणारी पूजा मूर्तिपूजेची पाचवी पायरी असते. "नर करणी करे तो नरका नारायण हो जाय" म्हणून ज्यांची प्रतिमा घरोघरीं पुजली जाते ते श्रेष्ठ कर्मवीर देवताच मानिले जातात आणि ती मूर्तिपूजेची सहावी पायरी असते. आणि अशा रीतीनें जरी मूर्तिपूजा पावित्र्यांत झाली तरी इतर वेळीं काम काज करीत असतांना जें त्यांचें सतत स्मरण राहतें आणि होत जातें तें स्मरण होणेंहि मानसिक पूजाच असतें. हें जे मूर्तिपूजेचें प्रकार सांगितलेले आहेत त्या पैकीं कोणत्याना कोणत्या तरी प्रकारें मूर्तिपूजा प्रत्येकाकडून होतच असते. म्हणून मूर्तिपूजा वाईट आहे असें जगांत वावरणारे तरी कधींहि म्हणतील असें वाटत नाहीं खास आणि पहिल्या प्रकारची पूजा जर नास्तिकाकडूनहि होतांना दिसते तर मग त्यांचा मूर्तिपूजेशीं विरोध आहे असें कोण म्हणूं शकणार? कारण व्यक्ति ही मूर्ति नव्हे आणि आदर अथवा सेवा करणे ही पूजा नव्हे असें कोण म्हणणार? पृथ्वी जेव्हां प्रथम उघडकीस आली तेव्हां पृथ्वीवर सर्व ठिकाणापेक्षां ज्यास्त उंच असलेला असा हिमालयाचाच भाग सुरुवातीस दिसणें साहजिक असल्यामुळें

हेंच स्थान आर्यांचें मूळ स्थान असणें साहजिकच आहे. आणि तेथूनच आर्य लोक पृथ्वी जस जशी पुढें ज्यास्त उघडकीस येत गेली तसतसें ते त्या ठिकाणीं पसरत जाणें साहजिक असल्यामुळें आतां जरीं ते चोहोंकडें पसरलेले दिसतात तरी त्या सर्वांचें मूळ स्थान असलेलें स्थानच त्यांना प्रिय असणें स्वाभाविक आहे. म्हणूनच त्या सर्वांचें लक्ष त्या मूळ स्थानाकडे आणि तें स्थान ज्या हिंदुस्थानांत आहे त्या हिंदुस्थानाकडे असलेलेच दृष्टोत्पत्तीस पडतें. आणि मूळ स्थान असलेल्या हिंदुस्थानसारख्या पुण्य भूमींत मूर्तिपूजा ज्या रीतीनें होते त्याच रीतीनें इतर ठिकाणीं जरी होत नसली तरी त्यांच्याकडून ज्या रीतीनें मूर्तिपूजा होते त्या रीतीनेंहि त्यांच्याकडून मानसिकपूजा होऊनच जाते. तरी पण कांहीं मंडळी मूर्ती फोडण्याचा प्रयत्न करितांना दिसतात त्यावरून त्यांचा मूर्तिपूजेशी द्वेष आहे असें नाहीं तर त्यांना वाटतें कीं आपण ज्या प्रमाणें मूर्तिपूजा करितो त्याप्रमाणेंच इतरांनींहि करावे, एवढेंच काय तें ! खरंच गाय सर्वांना सारखेंच दूध देते. पण गोवध मुद्दाम केला जातो तो काय ह्मणून ? हिंदूना गाय फारच पूज्य वाटते ह्मणूनच त्यांना दुखवावयाचेच असल्यास गोवध

करितात ना! त्याच प्रमाणें हिंदूंना मूर्तिपूजा पूज्य वाटते म्हणून त्यांचें मन दुखवावयाचें झाल्यासच मूर्ति फोडण्याचा प्रयत्न केला जातो ना! मग गोवध आणि मूर्तिभंग जो होतो तो गाईचा आणि मूर्तिपूजेचा द्वेष असतो म्हणून नव्हे तर त्याला कारणें इतर असतात हें समजणें कठीण कसें असणार! आणि फार काय, तर मुसलमानांनीं जर मूर्तिपूजेचा द्वेष केला असता तर मोहरमांत त्यांनीं सवाऱ्या मांडून सवारीपुढें मूर्तिपूजे-सारखे प्रकार कसें केले असते! एवंच काय, मूर्तिपूजेशीं कोणाचाहि जगांत वावरतांना विरोध नाहीं असेंच दिसून येतें खास. निजाम इलाख्यांत हुमणाबाद जवळ माणिक नगर आहे. त्या श्रीक्षेत्रसंस्थानाबद्दल सर्वत्र ख्याती आहे. हें स्थान फारच महत्वाचें होण्यास कारण तेथील श्री सद्गुरु मार्तंड माणिक प्रभु महाराज ह्यांना हिंदु धर्माचारा-प्रमाणें इसलामी धर्माचारांचेहि सर्वाधिकार असून या पीठास हिंदु लोक जसें मानतात त्याच प्रमाणें मुसलमान लोकहि अत्यंत प्रेमानें भजतात म्हणूनच विचारी जे असतात त्यांच्यांत केव्हांहि भांडण नसतें आणि ज्यांना भांडणेंच करावयाचीं असतात त्यांच्या कडून जे अविचार होतात त्यांना वाटतील ती कारणेंहि सांगतां येतात. अशा

प्रकारें विचार केला म्हणजे मूर्तिपूजा सर्वांना मान्य आहे असेंच दिसून येतें आणि कर्म करण्यांत जे ज्या मानानें श्रेष्ठ पदास पोंचतात त्यांचा त्या मानानेंच गौरव होत जाऊन त्या मूर्तीचेंच पूजन होतें ह्यांत संशय नाहीं. म्हणून जगांत वावरतांना कर्मयोगालाच विशेष महत्व असतें. जगाची वाढ गृहामुळें होते म्हणून गृहस्थाश्रमांतील गृहस्थाकडून जीं कर्मे केलीं जातात त्या कर्माला आणि तीं कर्में करणाऱ्या कर्मवीरांनाहि जगांत मान्यता असते. गृहस्थाश्रमांतील कर्मे योग्य व्हावींत ह्या हेतूनें ब्रम्हचर्याश्रमांत जें शिक्षण दिलें जातें तें शिक्षण घेत असतांना जीं कर्मे करावीं लागतात त्यांनाहि जगांत मान्यता असते. म्हणून शिक्षण ही कर्मयोगाची पहिली पायरी असल्यामुळें शिक्षणाकडे सर्वांचेंच लक्ष असतें. अशा प्रकारें कर्मयोगाची महति जगांत वावरतांनाच असते असें नाहीं तर जगांत जे वावरत नाहींत अशा साधू पुरुषांचें सुद्धां लक्ष जगांत वावरणाऱ्या कर्मवीराकडे असतें आणि असे कर्मवीरहि नेहमी साधूकडे लक्ष सुद्धां ठेवितातच. एवंच काय, जगांत वावरणाऱ्यांना आणि जगाशीं फटकून वागून फकिरी बाणा घेणाऱ्यांना अशा दोघांनाहि म्हणजे सर्व जिवांना जगांत वावरणाऱ्या

कर्मवीरांचें महत्व वाटतें. म्हणूनच जनतेला जनता जनार्दन म्हणतातहि. खरंच, असें आहे म्हणूनच श्री. तुकाराम महाराजांनीं श्री शिवाजी महारांजांना श्री समर्थ रामदास स्वामीकडे जाऊन त्यांचाच उपदेश मानावयास सांगितलें. कारण तसें जर नसतें तर श्री शिवाजी महाराजांना त्यांनीं नेहमी भजनच करावयास नसतें का लाविलें! श्री तुकाराम महाराजांनीं श्री शिवाजी महाराजांना काय बरं सांगितलें!

"राया छत्रपती ऐकावें वचन। रामदासीं ध्यान लावा वेगीं ॥ १ ॥ रामदास स्वामी सोयरा सज्जन। याशी तूं नमन अर्पी बापा ॥ २ ॥ मारुति अवतार स्वामी प्रगटला उपदेश केला तुज लागीं ॥ ३ ॥ रामनाम मंत्र तारक केवळ। जालासे सीतळ उमाकांत ॥ ४ ॥ उफराटीं नामें जपता वाल्मीक। जाला पुण्य श्लोक तात्कालिक ॥ ५ ॥ तेंच बीज त्यांसि वसिष्ठ उपदेश। त्याहूनि विशेष काय आहे ॥ ६ ॥ आतां धरूं नका भलत्याचा संग। राम पांडुरंग कृपा करी ॥ ७ ॥ धरूं नको आस आमुची भूपाळा। रामदासीं डोळा लावा वेगीं ॥ ८ ॥ तुझी चाड नाहीं आम्हां छत्रपति। आम्ही पत्रपति त्रैलोक्याचे ॥ ९ ॥ च्यारी दिशीं आम्हां भिक्षेचा अधिकार। नेमिली

भाकर भक्षावया ॥ १० ॥ पांडुरंगीं आमुची जाली पूर्ण भेटी । हातांत नरोटी दिधली देवें ॥ ११ ॥ आतां पद्दूं नको आमुचिया काजा । पवित्र तूं राजा रामभक्त ॥ १२ ॥ विठ्ठलाचे दास केवळ भिकारी । आम्हांलागीं हरीं उपेक्षिना ॥ १३ ॥ शरण असावें रामदासा लागीं । नमन साष्टांगीं घालीं त्यांसीं ॥ १४ ॥ तुका म्हणे राया तुज असो कल्याण । सद्‌गुरु शरण असें बापा ॥ १४ ॥

हल्लींचें काळीहि बुद्धीला विशेष महत्व असल्यामुळें तरवार बहादुरांचे ऐवजीं कलम बहादरांना कर्म करतां यावें म्हणून श्रीसमर्थांचाच अवतार असलेल्या लोकमान्यांनीं जसा जनतेला कर्मयोगाचाच उपदेश केला त्याच प्रमाणें श्री तुकाराम महाराजांचाच अवतार असलेल्या विश्वमान्य गांधींनीं भिक्षा टळावी ह्या हेतूनेंच टाळाच्या ऐवजीं आतां चरखा घ्यावयास सांगितलेला असला तर त्यांत आश्चर्य कसलें? असो.

वरील अभंगांत श्री तुकाराम महाराजांनीं श्री शिवाजी महाराजांना जें सांगितलें त्या वरून असेंच स्पष्ट सिद्ध होतें कीं "स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ॥" अशा प्रकारच्या त्यांनीं केलेल्या उपदेशावरून नेहमी भजनांत तल्लीन राहिल्यानेंच फक्त ईश्वर प्राप्ति

होते असें महाराजांचें म्हणणें असल्याचें जें कित्येक समजतात तें त्यांचें तसें समजणें बरोबर नाहीं! खरं पाहिलं असतांना श्री तुकाराम महाराजांचा तसा हेतु नसून जगांत वावरतांना जीं कर्मे करावीं लागतात तीं कर्मे करण्याकरितां जे योग्य असतील त्यांनीं आपलें कर्तव्य कर्म करून छत्रपती होण्याच्या मार्गास लागावे असा त्यांचा हेतु होता. त्याचप्रमाणें ज्यांना तसें राहावयाचें नसेल त्यांनीं भजनांत तल्लीन राहावे असाहि त्याचा हेतु होता. आणि दोन्हीहि मार्गानें ईश्वरप्राप्ति होते असें त्यांचें म्हणणें होतें हें श्री शिवाजी महाराजांना केलेल्या उपदेशावरून तर स्पष्ट होतें. ज्यांना आपलें कर्तव्य कर्म करून जगांत राहावयाचें नसेल त्यांनीं भजनांत तल्लीन राहिल्यानें त्यांचा जसा फायदा होतो त्याच प्रमाणें त्यांच्या तशा राहण्यानेंहि इतरांना त्रास होत नाहीं—नव्हे जगांत वावरणाऱ्यांना अळथळा तरी होत नाहीं—हा कांहीं जगाच्या दृष्टीनें लहान सहान फायदा नसतो. म्हणूनच जगांत वावरणाऱ्यांना श्री-समर्थांनें उपदेशामृत पाजून त्यांना कर्मवीर असें करावें कीं त्यांच्या कडून जगाची वाढ होत जाऊन जगांत श्रीमंतीची वाढच होत जावी आणि त्यायोगें जनता

जनार्दन असा जागृत राहावा कीं श्री तुकाराम महाराजांच्या उपदेशाप्रमाणें सतत भजनांत तल्लीन असणाऱ्याचाहि सांभाळ त्या जनता जनार्दनाकडून व्हावा. अशा प्रकारें दोन्हीहि मार्गांनीं ईश्वरप्राप्ति होते. म्हणून ज्यांना जगांत वावरावयाचे आहे तें आपलें कर्तव्य कर्म करीत राहतात आणि ज्यांना जगांत वावरावयाचे नाहीं ते भजनांत इतके मग्न असतात कीं अशा साधूसमोर जनता तर शेवटीं लोटांगणच घालते तेव्हां ते साधू संत सुद्धां जनतेला असाच उपदेश करितात कीं "चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां ॥ नाना उपभोग भोगितां । नाम विसरूं नये ॥ संपत्ति अथवा विपत्ति । जैसी पडेल काल गती ॥ नामस्मरणाची स्थिती सांडूचि नये ॥ नामें संकटें नासती । नामें विघ्नें निवारती । नामस्मरण पाविजेती । उत्तम पदें ॥" म्हणूनच जगांत वावरतांना जनतेप्रमाणें राहून कम करावेसें वाटतें आणि तसें राहणं कठीण वाटत असेल तर जगाशीं फटकून राहून साधू प्रमाणें हातांत टाळ घेऊन भजन करीत राहावेसें तरी वाटतें अथवा जगांत थोडे तरी कर्मच करून राहायाचें झालें तर टाळाच्या ऐवजी हातांत चरखा घेऊन चरख्यावर सुत कातावेसे वाटतें. पण नको तें शेषाच्या

तमोगुणी परम्परेंत सांपडून झटके खाणें आणि अविचारी होणें ! आणि ह्याच दृष्टीनें श्री तुकाराम महाराजांनीं जो उपदेश केला तो फारच महत्वाचा वाटून त्यांनीं स्वतः भजनच फक्त करीत राहून आणि इतरांनाहि भजनास लावून जो मार्ग दाखविला तोहि फारच महत्वाचा वाटतो. तसाच चरखाहि चालवावासा वाटतो. कारण भजनांत अथवा चरख्यांतच फक्त मन गुंतवून ठेविल्यानें जनतेला इतर मार्गांत तरी अडथळे कमी होतात खास. असें जर आहे आणि अविचारी लोकांपासून विचारी लोकांचें रक्षण करून सत्याचा जय कायमचा टिकविणें हें जें ईश्वराचें ध्येय आहे तेंच ध्येय सतत पटवून देण्याकरितां जर ईश्वरानेंहि जगांत अवतार घेऊन प्रत्येक अवतारीं जगांत वावरतांना जीं कर्में करावीं लागतात तींच कर्में करून दाखविलेलीं आहेत तर नेहमीं भजन करीत राहण्यानेंच फक्त ईश्वर प्रसन्न होतो असें कोण म्हणणार ! जगांत वावरणारी जनता तरी तसें न म्हणतां जनते पैकीं प्रत्येक जण आपलें कर्तव्य कर्म करीत असतांना मन बहकूं नये म्हणून अधिष्ठानाकरितां ईश्वराचें स्मरण करितात आणि त्यामुळें त्यांच्या कडून जसें कर्म घडतें त्याच मानानें त्यांच्या कडून

इतरांचा सांभाळ होऊन जगाची वाढ होते तेव्हां ते ईश्वरालाहि रुजूं असल्यामुळें जनतेंत जागृतावस्था असते म्हणूनच जनता जनार्दनाच्या जागृतावस्थेमुळें जग चाललें आहे आणि जग ज्या अर्थी चाललेलें आणि वाढीस लागलेलें आहे म्हणूनच तें जग आहे त्या अर्थी जगांत वावरतांना जगाच्या वाढीस कारण असणारा असाच कर्मयोग जगांत श्रेष्ठ आहे हेंच जनतेला शेवटीं पटल्याशिवाय राहत नाहीं. खरंच; तें पटतें म्हणूनच जगांत ज्यांना वावरावयाचें असतें त्यांच्या पैकीं प्रत्येक जण केलेल्या कर्माप्रमाणाचें मिळालेलें फल पुढें भोगण्या करितां असा कांहीं तयार असतो कीं इतरांनीं केलेली मदत घेणें सुद्धां त्याला अपमानास्पद वाटतें. मग परोपकाराच्या नांवाखालीं इतरांनी मदत केलीच पाहिजे असें म्हणून अशा मदतीची अपेक्षा त्यानें करीत राहणें तर लांबच राहिलें ? अशा प्रकारें जनता जागृत असते तेव्हां त्या जनताजनार्दनाची ईश्वराशीं असें कांहीं तादात्म्य होतें कीं ईश्वर कोठें असतो ह्याची जाणीव होऊन भगवत् गीतेंतील दहाव्या अध्यायांत सांगितलेल्या ठिकाणीं ईश्वराचें अस्तित्वहि असलेलें पटतें आणि त्यांतल्या त्यांत तेजस्वी सूर्याच्या ठिकाणीं आणि पुण्यशाली

राजाचें ठिकाणीं तर तें इतकें पटतें कीं रोज प्रातः काळीं सूर्याला नमन करण्याकडे जसें जनतेचें लक्ष असतें त्याच प्रमाणें बत्तीस लक्षणी राजाकडेहि जनतेचें लक्ष असतें. आणि सूर्य जसा प्रकाशतो त्याचप्रमाण बत्तीस लक्षणी राजाचेंहि तेज पडतें. जन्म, मृत्यु, लाभ व हानि हे ईश्वराचे स्वाधीन असल्यामुळें बत्तीस लक्षणी पुरुष जन्मास आलेला असा कोणीहि जरी आज दिसत नसला तरी त्यापैकीं बरींच लक्षणें ज्यांच्या अंगीं आहेत असें कांहीं जन्मास येतातच आणि ते त्या मानानें जगांत चमकतातहि. खरंच; जन्म, मृत्यु, लाभ व हानि ह्यापैकीं कांहींहि मनुष्याच्या स्वाधीन नसून ते ज्या शक्तीच्या स्वाधीन आहेत ती ज्याची शक्ति आहे तोच ईश्वर आहे हें अगदीं खरं. कारण कांहीं जीव श्रीमंतांच्या घरीं जन्मास येऊन गर्भ श्रीमंतीचें सुख भोगतांना दिसतात तर कांहीं जीव जन्मापासूनच दारिद्र्यांत लोळतांनाहि दिसतात. कधीं कधीं तर श्रीमंतांच्या घरीं प्रजेचा अभाव असतो पण गरीबांच्या घरा पाहावें तर मुलाबाळांचें लेंढार असून त्यांना खायप्यायला मिळण्याची सुद्धां मारामार पडते. तसेंच मृत्यूसंबंधानें पाहावें तर अकालीं मृत्यु येतो श्रीमंतांच्या घरा; आणि गरीबांच्या

घरीं पाहावें तर म्हातारे वाटतील तितके. बरं; औषधानीं आयुर्मर्यादा वाढते असें म्हणावें तर तसेंहि दिसून येत नाहीं. कारण श्रीमंताच्या घरीं औषधी उपाय इतके कीं डॉक्टरांच्या आणि वैद्याच्या एक सारख्या मोटारी लागलेल्या असतात आणि गरीबांना धर्मार्थ कोणी दिलें तर औषध मिळणार आणि शेवटीं श्री तुकाराम महाराजांनीं म्हटल्याप्रमाणेंच अनुभवास येणार कीं "तुका म्हणें भोग सरे, गुण येती अंगारे." त्याच प्रमाणें लाभ व हानि कशी होऊन जाते हें होत तोंपर्यंत समजत सुद्धां नाहीं. पण होऊन गेल्यानंतर मात्र मी मी म्हणणारे नास्तिक सुद्धां असं कसं झालं असें म्हणून घटकाभर डोकेंच खाजवित बसतात अगर कांहीं वेळ तोंडांत बोटं तरी घालून बसतात. म्हणून जगांत जे वावरतात ते जन्मल्यापासून पूर्वकर्मानुरुप मृत्युचा जो दिवस ठरलेला असेल त्या वेळे पर्यंत कर्म करीत राहतात आणि "जसें कर्म तसें फल" आणि "हांसत कर्म करावें भोगावे रडत तेंचि परिणामीं" ह्या तत्वांची त्यांना इतकी जाणीव असते कीं तें इतर कोणालाहि दोष लावीत न बसतां स्वतःच मिळालेलें फल भोगण्याकरितां तयार असतात आणि ईश्वरालाहि त्या संबंधानें कांहीं एक न म्हणतां त्याची

प्रार्थना करीत असतांना त्याच्यापाशीं मागणें म्हणून कांहीं मागावयाचेंच झालें तर त्यांचें मागणें इतकेंच असतें कीं त्यानें जन्मास घालतांना अशा ठिकाणीं जन्मास घालावें कीं त्या ठिकाणीं संत संग मिळावा. खरंच; मुक्ति, धन, संपदा वगैरे सर्व कांहीं जें मिळावयाचें तें केलेल्या कर्माप्रमाणें मिळणारच आणि त्यांत कमी अधिक करणें कोणाच्याहि स्वाधीन नसून ज्याचें त्याला कर्माप्रमाणें मिळणारें फल भोगणें भाग असणारच. मग ईश्वराजवळ त्या संबंधानेंच मागणें मागून काय होणार आणि तो तरी कमी जास्त काय देणार ? उलट ईश्वर न्यायी असल्यामुळें त्यानें शिक्षा जरी केली तरी शिक्षा करण्यांतहि त्याचें कृपाळूपणच आहे असें अपराधी सुद्धां म्हणणारच. कारण अपराध्यांना जर वेळेवर शिक्षा न मिळाली तर त्यांच्या कडून पुढें मोठाले अपराध घडणें साहजिक असल्यामुळें प्रथमच वेळेवर शिक्षा करण्यांतहि कृपाळूपणच असते ह्याची अपराध्यांना सुद्धां जाणीव नसते असें नाहीं. म्हणूनच जनतेपैकीं प्रत्येक जण ईश्वराजवळ असेंच मागणें मागतात कीं ह्या योगे त्याचा न्यायीपणाहि कायम राहतो आणि मागणाऱ्यांनाहि फायदाच होतो. खरंच; मिळालेलें फल चांगलें असलें तरी तें टिकवून ठेविण्याकरितांहि संत

संग जसा पाहिजे असतो त्याच प्रमाणें मिळालेलें फल वाईट असलें तरी पुढें चांगलें फल प्राप्त व्हावें ह्याहि हेतूनें संत संग पाहिजेच असतो. श्री तुकाराम महाराजासारख्या साधूंनीं सुद्धां ईश्वराजवळ जें दान म्हणून मागणें मागितलें तें अशाच प्रकारचें दान मागितलं ना कीं "हेचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा ॥ गुण गाईन आवडी, हेंचि माझी सर्व गोडी ॥ नलगे मूक्ति, धन, संपदा, संत संग देई सदा ॥ तुका म्हणे गर्भवासी, सुखे घालावे आम्हासी ॥" असें जर आहे आणि मीहि जनतेपैकीं एक आहे तर मग तशाच प्रकारचें दान माझ्याच्यानेंहि मागितल्याशिवाय कसें राहवेल ? आणि त्यांतल्या त्यांत ह्या जन्मीं तर चांगलाच अनुभव आलेला. म्हणूनच ईश्वराची प्रार्थना करीत असतांना मीहि साधू संतांच्याच उपदेशाप्रमाणें मागणें मागून नियोजित विषयावर लेख लिहिण्यापूर्वीं रोज प्रातःकाळीं कर्माला सुरुवात करण्यापूर्वीं म्हटली जाणारी खालील अवतार भूपाळी म्हणून ईश्वराला नमन करण्याची परवानगी घेतों.

"जन म्हणाहो श्रीहरी, प्रातःकाळीं स्मरण करीं ॥ तेणें तराल भवसागरीं, हा निर्धारी भरंवसा ॥ धृ ॥ वेद नेले निशाचरी, मत्स्यरूप झाले हरी ॥ कार्य ब्रम्हयाचे

करी शंखासूर वधोनिया ॥ १ ॥ दैत्य मातले भूमंडळीं, पृथ्वी नेली रसातळीं ॥ कूर्मरूपी हो वनमाळी, पृष्ठी धरिली मेदिनी ॥ २ ॥ मही डळमळली पहावो, देव झाले ते वराह हो ॥ मग वधिले दैत्य दानवो, पृथ्वी दाढें धरूनियां ॥ ३ ॥ पुत्र पित्यानें गांजिला, तो हा नरहरि स्मरता झाला ॥ स्तंभीं अवतार धरियेला, भक्त रक्षिला प्रल्हाद ॥ ४ ॥ याग करितां झाला बळी, इंद्र कांपिन्नला चळाचळी ॥ वामन रूपें हो वनमाळी, घालीं पाताळीं बळीराज ॥ ५ ॥ रेणुके उदरीं भार्गव झाले, राजे समस्त संहारिले ॥ राज्य ब्राम्हणा दिधलें, सुखी केले भूदेव ॥ ६ ॥ सूर्य वंशी रघुनंदन, वानर सैन्य मेळावून ॥ सागर पाषाणीं बांधून संहारिले राक्षसां ॥ ७ ॥ कारागृहीं अवतरले, श्रीकृष्ण गोकुलीं वाढिन्नले ॥ कंस चाणूर मर्दिले, राज्यीं स्थापिले उग्रसेना ॥ ८ ॥ बौद्ध अवतार धरिला जन हा बहुत कष्टी झाला ॥ मग कलीस वर दिधला, आपण राहिले निद्रिस्थ ॥ ९ ॥ पुढें कलंकी होणार, ऐसा शास्त्राचा निर्धार ॥ मग फिटेल भवसंदेह, या हो विश्वजनाचा ॥ १० ॥ दशावतार भूपाळी, नित्य स्मरता प्रात:काळीं ॥ दास म्हणे हो भूमंडळी, भाग्यवंत होतील ॥ ११ ॥

॥ श्री ॥



# " वानप्रस्थाश्रम "

लेखाला आरंभ करण्यापूर्वी सूज्ञ मंडळींची प्रार्थना करून त्यांना नमन करणें हीच लेखाची प्रस्तावना म्हणून तशी प्रस्तावना झाली. त्या नंतर ज्या सात्विक गुणाचा अंश वाढीस लाविल्यामुळें सुज्ञ मंडळी जगांत धन्य आहेत तो सात्विक गुण ज्याचा आहे अशा ईश्वराची प्रार्थना करणें ओघानेंच आल्यामुळें ईश्वराचीहि प्रार्थना केली. आणि आतां लेखाला आरंभ करण्याची वेळ आली. जगांत वावरतांना जगाची वाढ करण्याची जबाबदारी गृहस्थावरच असल्यामुळें गृहस्थाश्रमांतील कर्में गृहस्थाकडून ज्या मानानें होतात त्याच मानानें जगाची वाढ होते म्हणून चारीहि आश्रमांत श्रेष्ठ असलेल्या गृहस्थाश्रमांवर लेख लिहिल्यानंतर त्या

आश्रमाला योग्य असा पाया पाहिजे ह्या हेतूनें ब्रम्हचर्याश्रमावर लेख लिहिला. अशा प्रकार कळसाच्या मानानें असणाऱ्या अशा योग्य पायावर लेख लिहून विचार केल्यानंतर पुढें काय, हा प्रश्न निघणें साहजिक असल्यामुळें गृहस्थाश्रमानंतर येणाऱ्या पुढील आश्रमाकडे लक्ष गेलें म्हणून आतां त्या वानप्रस्थाश्रमावर लेख लिहिणें ओघानेच आलें. वानप्रस्थाश्रम हा लेखाकरितां तर फारच चांगला विषय आहे, पण अगदी नवीन आहे. आणि त्या विषयावर पूर्वी लेख लिहिलेले असें फारसें ऐकण्यांतहि नाहींत. तरी पण वानप्रस्थाश्रम हा शद्ब सर्वांच्या ऐकण्यांत आहे. कारण जगांत वावरतांना मनुष्यांना ज्या चार आश्रमांतून राहावे लागते त्या चार आश्रमापैकीं वानप्रस्थाश्रम हा एक आश्रम आहे हें सर्वांना ऐकून तरी माहीत आहे खरं. म्हणून इतर तिन्हीहि आश्रमांतील मंडळी म्हणजे ब्रम्हचारी, गृहस्थ आणि सन्यासी जसें पुष्कळ दिसतात त्या प्रमाणें वानप्रस्थाश्रमी पुष्कळ जरी दिसत नसले तरी ते जगांत असले पाहिजेत ह्यांत संशय नाहीं. आणि ज्या अर्थी एक तरी वानप्रस्थाश्रमी आपल्या पाहण्यांत आलेले आहेत त्या अर्थी जगांत वानप्रस्थाश्रमी आहेत असें म्हटल्यावांचून माझ्यानें तरी

राहवत नाहीं. कोण बर ते वानप्रस्थाश्रमी ! मृदंगाचार्य श्री. लक्ष्मणरावजी हेच ते वानप्रस्थाश्रमी. मी जबलपूर मुक्कामीं असतांना १९१९ सालीं त्यांची जेव्हां गांठ पडली तेव्हां त्यांनीं काय बरं सांगितलं ? त्यांनीं वानप्रस्थाश्रम घेतल्याबद्दलचेंच सांगितलें. ते गृहस्थाश्रमांत असतांना हैदराबाद ( दक्षिण ) येथें निजाम सरकारचे पदरीं खासगींत हार्मोनियम शिक्षक असून त्यांना रुपये १०० दरमाहा पगार होता आणि त्यांनीं जरी वानप्रस्थाश्रम घेतला तरी त्यांना तोच पगार पेनशनी प्रमाणें चालू असल्याचें त्यांनीं सांगितले. त्यांची राहणी गृहस्थाप्रमाणें होती आणि सन्यासाप्रमाणेंहि होती. म्हणजे त्यांना शेंडी आणि मिशा होत्या आणि त्यांच्या अंगावर जे कपडे होते ते सन्यासासारखे होते. आश्रमानुरुप जें कर्म करावयाचें तें लोकशिक्षण देणें हेंच कर्म असल्यामुळें ते मृदंग पुराण सांगतांना निरनिराळ्या प्रकारे असें कांहीं शिक्षण देत कीं ऐकणाऱ्यांना तें फारच उपयोगी असे. आणि त्यांनीं पुराणाचा सप्ताह देवळांत करून इतर वेळींहि बिन्हाडी सुद्धां मंडळी जमली कीं त्यांची थाप मृदंगावरच पडत असे आणि तोंडातून जे शब्द निघतील त्यांत सर्व लोकशिक्षणच भरलेलें असें.

मृदंग पुराणाचा सप्ताह होऊन अखेरच्या दिवशीं जी संभावना होईल तीच ते प्रवास खर्चाकरितां उपयोगांत आणित असत. म्हणून त्यांना स्वतःच्या खर्चाकरितां कोणा पुढें केव्हांहि हात पसरण्याचें काम पडत नसें इतकेंच नाहीं तर सहज कोठें भाड्याचें तांग्यांत जाण्याचा प्रसंग जरी आला तरी तांग्यातून उतरल्या-बरोबर एकदम भाड्याचे पैसे ते देऊन टाकित असत. आणि त्या योगें त्यांच्या बरोबर जाणाऱ्यालाहि त्याचें तसें करणें कसेंसेच वाटें. त्यांना कुटुंब असून कुटुंबा-च्याच परवानगीनें त्यांनीं वानप्रस्थाश्रम घेतला असल्याचें सांगितले आणि कुटुंबहि एका सार्वजानिक कार्यांत काम करीत असल्याचें सांगून कुटुंबाचें नांव "आनंदी" असल्याचें त्यांनीं मला खुणेकरितां म्हणून सांगितले. मला कुटुंबाचें नांव सांगण्यांत त्यांचा इतकाच हेतू होता कीं मी त्यांच्याशीं पत्रव्यवहार करीत असतांना हें नांव खुण म्हणून त्यांत अवश्य लिहावे. कारण त्यांचें व्यवहारिक नांव दुसरेंच होतें. असो. अशा प्रकारे एका तरी वानप्रस्थाश्रमांत असणाऱ्या संताचें दर्शन झालें म्हणून मनाला आनंद झाला. "जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति" म्हणूनच अशा विभूति कडून जें लोकशिक्षण दिलें जातें तें जगांत वावरणाऱ्यांना फारच हितावह

असतें. म्हणून जगांत जे वावरतात तेहि आपल्यां मर्यादित असलेल्या अशा आश्रमानुरुपच कर्मे करीत राहतात यांत संशय नाही. खरंच; विभूतींना वयाची मर्यादा नसते म्हणून ते जन्मभर जसे ब्रम्हचारी राहूं शकतात त्याच प्रमाणें त्यांना वाटेल त्या वयांत वाटेल तो आश्रम घेऊन सन्यास सुद्धां वाटेल तेव्हां घेतां येतो. आणि अशा विभूतींना चार खुंट जहागिरी अशी कांहीं असते कीं त्यांची नजर जेथपर्यंत पोंहचेल त्या ठिकाणा-पर्यंत ते बादशहा असतात आणि त्यांच्या त्या दृष्टीच्या आंत असणाऱ्या बादशाही सृष्टींत त्यांच्यांशीं भांडणारा कोणीहि नसतोच. अशा विभूतिचा लोकशिक्षण देण्या-करितां जेव्हां जगांत वावरणाऱ्या जनतेशीं संबंध येतो तेव्हां ते आपला मुक्काम ठेवितात देवळांतच, अगर प्रार्थना मंदिरांत, अगर सराईत अथवा धर्मशाळेंत कारण ते ईश्वराचे शिपायी असल्यामुळें ज्या ठिकाणीं ईश्वराचें वास्तव्य असतें तेंच ठिकाण त्यांना नेहमी पसंत असतें. आणि ते जरी पत्रपति असतात तरी त्यांच्यापुढें छत्रपति सुद्धां लोटांगणच घालीत असतात. म्हणून विभूतींना वयाची मर्यादा नसते. पण जगांत जे वावरतात ते मात्र असे कांहीं चोहोंकडून जखडलेले असतात कीं त्यांना

हूं का चूं सुद्धां करता येत नसून वयांनीं मर्यादित असलेल्या अशा आश्रमांतूनच जाणें भाग असतें. पूर्णा· युष्य असलें तरच त्यांना चारीहि आश्रमांतील कर्मे करण्याचा योग येतो. नाहीं तर जितके आयुष्य लाभेल तितक्या आयुष्यातील आश्रमानुरुप कर्म करतां करतांच त्यांचें इतर आश्रम राहूनच जातात. कारण विसावे वर्षीच मृत्युनें गांठले तर बिचाऱ्याचा ब्राम्हचर्याश्रमच पूर्ण होत नाहीं, मग त्याला पुढील आश्रमाबद्दल कसली गोष्ट? म्हणूनच जगांत वावरणारी जनता आश्रमानुरुपच कर्मे करीत राहतात आणि उद्यां काय पाहिजे ह्याची तयारी करण्यांत इतकें मग्न असतात कीं उद्यां काय होईल ह्याचें स्मरण सुद्धां करण्यांत ते आपला वेळ व्यर्थ घालवीत नाहींत. खरंच; गृहस्थाश्रमांतील गृहस्थ मुलांनीं पुढें चांगले गृहस्थ व्हावें म्हणून मुलांची किती तरी काळजी घेत असतात आणि मुलेहि आपल्या विद्यार्थी दशेंत असतांना पुढें परिक्षा पास होत जावी म्हणून किती तरी काळजीपूर्वक अभ्यास करीत असतात! पण कोणाच्या तरी असें मनांत येतें का, कीं हें पाहिजे कशाला! खरंच; त्यांच्या असेंच अनुभवास येतांना दिसते ना, कीं जगलें तर तें पुढें पाहिजेच असतें. म्हणूनच ते अभ्यास करीत

जातात ना ! असें आहे म्हणूनच जग चाललेलें आहे. आणि एक सारखें वाढीस लागलेलें आहे म्हणूनच तें जग आहे आणि वयानें मर्यादित असलेल्या अशा चारीहि आश्रमातून क्रमाक्रमानें जाणारेहि जितके पाहिजेत तितके जगांत नेहमी असतातच. खरंच. २५ वे वर्षापर्यंत मर्यादित असलेल्या अशा ब्राम्हचर्याश्रमांत किती तरी मुलं, त्यांना विद्यार्थी म्हणा किंवा ब्रम्हचारी म्हणा, शाळेंतून आणि इतर मार्गानें शिक्षण घेत असतात आणि त्या विद्यार्थ्यांतून गळतां गळतां किती तरी पुढें गृहस्थाश्रमांत प्रवेश करून २६ ते ५५ वे वर्षापर्यंत मर्यादित असलेल्या अशा गृहस्थाश्रमांत सुद्धां गृहस्थ म्हणून वावरणारे असतात. हे आश्रम वयानें असे मर्यादित असतात कीं त्यांना त्यापुढें आश्रमांत राहणें योग्यच नसतें. फार काय तर ज्या ठिकाणीं गृहस्थाश्रमांतील कर्मे केल्यानंतर त्यांना बैठा पगार देण्याचें ठरलें असतें त्या ठिकाणीं तर अशी मंडळी ५५ वें वर्ष संपले कीं कामावरून दूरच केले जातात. म्हणून गृहस्थाश्रमानंतर पुढील जो आश्रम असतो त्या वानप्रस्थाश्रमाची मर्यादा ५६ ते ७५ वे वर्षापर्यंत असते कारण अशा मंडळीकडून आश्रमानुरुप केलें

जाणारें कर्महि त्यांच्या शक्त्यनुसारच असतें. जन्मल्या-पासून मरेतों पर्यंत कांहींना कांहीं तरी कर्म जरी मनुष्यांकडून होतें तरी प्रत्येक कर्माचें फल वेगळें असल्यामुळें आश्रमानुरुप कर्म करणेंच त्यांचें कर्तव्य कर्म असतें. म्हणून ब्रम्हचर्याश्रमांत विद्या संपादन करण्या-करितां जे कर्म करावें लागतें त्याचें मिळणारें फल गृहस्थाश्रमांत भोगाव लागतें. तसेंच ज्या मानानें विद्या संपादन केलेली असेल त्याच मानानें पुढें गृहस्थाश्रमांतील कर्मे करून ऐपतीची जेव्हां वाढ होते तेव्हांच गृहस्थांचा गृहस्थाश्रम चांगला होतो आणि त्याचें फल त्यांना वानप्रस्थाश्रमांत भोगावें लागतें. म्हणून विद्या संपादन करण्याकरितां करावीं लागणारीं कर्में जसें ब्रम्हचर्या-श्रमांतील कर्तव्य कर्म असतें त्याच प्रमाणें जगाची वाढ करण्यास कारण असणाऱ्या ऐपतीची वाढ करण्याकरितां जीं कर्में करावीं लागतात तींच कर्में करणें गृहस्थां-श्रमांतील कर्तव्य कर्म असतें. आणि ह्या दोन्हीहि आश्रमांतील कर्तव्य कर्म करणें फारच महत्वाचें जरी जगाच्या दृष्टीनें असलें तरी वानप्रस्थाश्रमांत जें लोक-शिक्षण देणें हें कर्तव्य कर्म असतें त्यालाहि विशेष महत्व असतें. कारण उपदेश करणाऱ्या विभूतींनीं जें

लोक शिक्षणाचें कार्य केलेलें असतें त्याचा अनुभव कसा आला हें सांगणेंहि लोकशिक्षणाच्या दृष्टीनें जगांत महत्वाचेंच असतें. म्हणून वानप्रस्थाश्रमांत असतांना जें कर्तव्य कर्म करावयाचें असतें तें अनुभव सांगून लोक शिक्षण देणें हेंच असल्यामुळें वानप्रस्थाश्रमांत वावरणारेहि तशाच प्रकारे आपलें कर्तव्य कर्म करतातच. अशा प्रकारे आश्रमानुरुप कर्में करीत असतांना ईश्वराचें अधिष्ठान असावें ह्मणून त्याचेंहि स्मरण जगांत वावरणारे नेहमी करीत असतातच. "कामांत कामा भज राम-नामा" असें ह्मणण्यांत तरी तोच हेतू असतो. तरी पण ब्रह्मचर्याश्रमांत आणि गृहस्थाश्रमांत असतांना आश्र-मानुरुप जा कर्में केलीं जातात तीं कर्में करीत असतांना ईश्वराचें स्मरण करण्यास जितका अवधी मिळतो त्या पेक्षां वानप्रस्थाश्रमांतील कर्म करीत असतांना जास्त अवधी मिळतो. कारण आश्रमानुरुप कर्म करणें त्या आश्रमांत तर बरेंच हलकें झालेलें असतें. खरंच; वानप्रस्थाश्रमांत प्रवेश होतां क्षणींच किती तरी ओझें कमी झाल्यासारखें होतें आणि पूर्वीच्या आश्रमांतील कर्माप्रमाणेंच कर्म करून ओझें लावूनच ठेवावें असें कोणी ह्मटले तर ते सहन करण्याची शक्ति तरी पूर्वीप्रमाणें

त्यांच्यांत असतें कोठें ? नाइलाजास्तव तसें करण्याचा प्रसंग आलाच तर ते जबरदस्तीनें रडत खडत करितात एवढेंच काय तें ! तरी पण वयाच्या ७५ वें वर्षानंतर वयमानाप्रमाणें तर अशी कांहीं स्थिति प्राप्त होतें कीं त्यांना ईश्वराचें नामस्मरण करण्याशिवाय इतर कोणत्याहि प्रकारचें पूर्वाश्रमांतील कर्मांप्रमाणें एखादेंहि कर्म त्यांच्याकडून होणें पुढें शक्यच नसतें ह्मणूनच कीं काय कोण जाणें, त्यानंतर असणाऱ्या पुढील आश्रमालाहि सन्यासाश्रमच ह्मणतात आणि त्यामुळेंच सन्यास ह्मटले कीं कर्मांचा त्याग असाच त्याचा अर्थ होतोहि. वयानें मर्यादित असलेल्या आश्रमांत असेंहि जरी होत असलें तरी त्याला मुद्दां कांहीं मंडळी अपवाद ह्मणून असतातच. परंतु बहुतेकांची स्थिति मात्र त्या प्रमाणेंच होते खरी. एवंच काय, तर जगांत जे वावरतात ते जेव्हां वयानें मर्यादित असणाऱ्या अशा ५६ ते ७४ वे वर्षापर्यंत ज्या आश्रमांत असतात तेव्हां तोच त्यांचा वानप्रस्थाश्रम असतो आणि त्या आश्रमांत त्यांना जें कर्तव्यकर्म ह्मणून करावयाचें असतें तें इतकेंच असतें कीं त्यांनीं पूर्वाश्रमांतील आलेले अनुभव लोकशिक्षण देण्याकडे दृष्टी ठेवून अशा प्रकारें सरळ रीतीनें सांगावेत कीं त्या योगें ऐक-

णाऱ्यांना सुद्धां कांहीं तरी फायदाच झाला पाहिजे! असें जर आहे तर मग ज्या अर्थी वानप्रस्थाश्रमांत प्रवेश करण्याची वेळ आतां मला लाभलेली आहे त्या अर्थी आतां पर्यंत जो मला अनुभव आलेला आहे तोच अनुभव सरळ रीतीनें सांगणें हें माझें कर्तव्य कर्मच आहे असें ह्मटल्यावाचून माझ्याच्यानें तरी कसें राहवेल! माझें तें कर्तव्य कर्म आहे असेंच नव्हें तर वयाच्या ५६ वे वर्षी वानप्रस्थाश्रमांत प्रवेश करणें नैसर्गिक असल्यामुळें जसा तो माझा जन्मसिद्ध हक्क आहे त्याचप्रमाणें त्या आश्रमानुरुप असलेलें कर्तव्यकर्म करणेंहि माझा जन्मसिद्ध हक्क असल्यामुळें मला जर आपलें कर्तव्यकर्म करावयाचें आहे तर तो असलेला हक्क आचरणांत आणणें मला भाग आहे आणि असें करणें धर्मानुरुप असल्यामुळें कर्म धर्म संयोगानेंहि तें युक्तच आहे. कारण जन्म होणें नैसर्गिक असल्यामुळें ज्या धर्मांत जन्मावरून जाती मानल्या जातात अशा हिंदू धर्मांतील ब्राह्मण जातींत माझा जन्म झालेला असल्यामुळें लोकशिक्षण देणें हें ब्राह्मणाचें जन्मसिद्ध कर्तव्यकर्म असल्यामुळें तेंहि हक्कासारखें आहे ह्मणून धर्माच्या दृष्टीनेंहि हा जन्मसिद्ध हक्कच आहे. ह्मणूनच आतांपर्यंत पूर्वींच्या आश्रमांत असतांना जे

अनुभव आलेले आहेत त्यांत इतरांना हितावह होतील अशा लोकशिक्षणाच्या दृष्टीनें जे अनुभव आलेले असतील तेच अनुभव जर सांगाव-याचे झालें तर ते कोणते बरे अनुभव मुख्यत्वेकरून सांगावेसें वाटतात ? गृहस्थाश्रमांत असतांना तर पुष्कळच अनुभव येत असतात आणि त्यांत सामाजिक आणि राजकीय प्रकरणांतील अनुभवहि येतच जातात. पण काय ! त्यांच्या मुळाशीं जर महत्वाची बाब असेल तर ती असते गृहासंबंधानेंच. कारण राजकारणांत हल्लीच्या भाषेंत ह्मणावयाचे ह्मणजे Home rule is my birth-right असें ह्मणण्यांत होमलाच ह्मणजे गृहालाच जसें महत्व असतें त्याचप्रमाणें सामाजिक ह्मणा कीं धार्मिक ह्मणा विचार करतांनाहि Charity begins at home असें ह्मणण्यांत होमला ह्मणजे गृहालाच महत्व असतें. आणि चारीहि आश्रमांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ असून ज्या अर्थी इतर तिन्हीहि आश्रमाची शोभा गृहस्थाश्रमावरच असल्यामुळें जगांत वावरणाऱ्यांना गृह असल्याशिवाय गृहस्थ ह्मणवून घेतां येत नाहीं त्याअर्थी गृहासंबंधानें असलेली माहितीच सर्वांना प्रिय असणें साहाजिक असल्यामुळें तशा प्रकारची माहिती जनतेला उपयोगी असणार ना !

५१
3262

आणि गृहें बांधण्यासंबंधानें जीं कामें करावीं लागतात तींच कामें हस्तांतून गेलेलीं असल्यामुळें त्यां संबंधानें असलेलीच माहिती अनुभव ह्मणून सल्लाहि सांगणें इष्ट असणार ना ! पण काय, त्या संबंधानें असलेली माहिती जी सांगावयाची ती तर मी पूर्वींच सांगून टाकिली. मग आंता सांगण्यासारखी अशी जास्त माहिती राहिली तरी कोणती ? होय. सांगण्यासारखी आणखी जास्तसुद्धां माहिती राहिलेली आहे खरी. पण कांहीं अपरिहार्यकारणामुळें ती आतांच सांगतां येण्याजोगी नसली तरी सध्यांपुरते पूर्वीं सांगितलेलीच माहिती पुरेशी आहे असेंच पुन्हां सांगतांना एक महत्वाची गोष्ट सांगावीशी वाटते कीं निरनिराळ्या परिस्थितींत निरनिराळ्या प्रकारानें त्या माहितीचा उपयोग करावा लागत असल्यामुळें त्या संबंधानें ज्यांना जी माहिती पाहिजे असेल त्याना ती प्रत्यक्ष समजावून सांगितल्याशिवाय कामहि भागत नाहीं आणि त्यांतल्यात्यांत ऐपतीच्या मानानें गृहाची बांधणी करावयाची असल्यामुळें कमी खर्चांत सोयीवार गृहें कशीं बांधतां येतील ह्याचा विचार तर गृह बांधविणारा गृहस्थ प्रत्यक्ष भेटल्याशिवाय करतां येत नाहीं. ह्मणूनच ह्या लेखांत जास्त माहिती न सांगतां मी जी

पूर्वी दोन लेखांत माहिती सांगितलेली आहे त्या लेखाकडे त्यांनीं लक्ष द्यावें अशी विनंति करून ह्या लेखाच्या द्वारें मला इतकेंच सांगावेसें वाटतें कीं ज्याना त्या संबंधानें जास्त माहिती पाहिजे असेल त्याना लागणारी माहिती देण्याकरितांच नव्हे तर ऐपतीच्या मानानें बांधल्या जाणाऱ्या गृहाचा नकाशा वगैरे काढून देण्याकरितां पूर्वकर्मानुरुप ठरलेली आयुर्मर्यादा जी असेल त्या वेळेंपर्यंत जनता जनार्दनाची सेवा घडावी ह्या हेतूनें मी आतां मोकळा असल्यामुळें स्वशक्त्यनुसार काम करण्याकरितां तयार आहो असें सांगून आणि स्वत्वाची जाणीव कायमची राहील असें शिक्षण ज्या संस्थेकडून दिलें जातें अशा संस्थेनें मला कळविल्यास त्यानाहि माझ्यासारख्याकडून जी मदत करतां येण्याजोगी असेल ती मदतसुद्धां स्वशक्त्यनुसार करण्याकरितां आतां माझी तयारी आहे असें त्यांच्याहि नजरेस आणून ज्या नर्मदा माईच्या कृपेनें विचारास वळण लागलें आणि लेख लिहिण्याची स्फूर्ति झाली त्या जागृत देवतेला नमन करून " हर नर्मदे, हर, हर, महादेव " च्या जय घोषांत श्री सच्चिदानंद महाराज वडगांवकर ह्यांच्या प्रेरणाज्ञेनें हा बारावा लेख श्री शिवार्पण करण्याची परवानगी घेतों.

गत वर्षी ब्रम्हचर्याश्रम ह्या विषयावर लेख लिहिल्या-नंतर सबंध वर्षांत जितके भितीदायक प्रसंग आले त्या सर्व प्रसंगीं सत्याचा जय अंतीं कसा होतो आणि मिथ्यालाच सत्य समजून कवटाळणाऱ्यांना सुद्धां अंतीं झटके कसे बसतात ह्याची जाणीव होऊन जगाच्या वाढीस कारण असणाऱ्या अशा गृहांना सांभाळणाऱ्यां-नाच चोहोकडून मान्यता मिळालेली दिसली आणि अशा जनतेचें लक्ष "प्रपंच साधुनि परमार्थाचा, लाभ जयानें केला ॥ तो नर भला भला, भला भला ॥" ह्या साधू वचनाकडे गेलेलें दिसून त्या योगें जगांतला रडकेपणा आणि भिकारवाडा जाऊन कर्म योगाकडे लक्ष गेल्यामुळें जगांत श्रीमंतीची त्या मानानें वाढ होतांना दिसली आणि स्वत्वाची जाणीव ज्यांनीं कायम ठेविली त्यांना कोठेहि गेले तरी त्या ठिकाणीं सुद्धां रहिवाश्याप्रमाणें राहतां येऊन अंतीं सुख प्राप्त होतांना जसें दृष्टोत्पत्तीस पडलें त्याच प्रमाणें स्वत्वाची जाणीव कमी होत चालली म्हणजे नास्तिक पणा वाढून त्या योगें घरालाहि पारखा होणें साहजिक असल्यामुळें त्यायोगें अशा सुधारकांना अंतीं दुःख कसें होते हेंहि दृष्टोत्पत्तीस पडलें आणि ह्या क्षयनाम संवत्सरांत तर तमोगुणी शेषाच्या प्रभावामुळें

जिकडे तिकडे अपशब्दांच्या भडिमाराखालीं एकच गोंधळ उडून गेलेला दिसला तरी प्रत्येक प्रसंगीं देववाणीमुळें शेवटीं भितीच नाहींशी होऊन त्यायोगें भवसंदेहच फिटलेला दिसला, तसेंच नवें वर्ष बंधु भगिनींना, मुलाबाळांना आणि सर्वत्र मंडळींना सुखाचें जाऊन प्रत्येक भितीदायक प्रसंगीं त्यांचें भवभय हरण होत जाऊन त्यायोगें त्यांचा भवसंदेह फिटत जावो आणि कर्मयोगाच्याच द्वारें ऐपतीची वाढ होऊन त्यांच्यावर ऐपतीच्या मानानें सोन्याचें पाणी पडून त्यांचा पाणीदारपणा गृहावर चमकावा म्हणून त्यांच्या कडून गृहांची वाढ होऊन गृहांचा सांभाळ होत जावो, असें जनतेचें शुभ चिंतून वत्सरारंभाच्या सुमुहूर्तावर ध्वजारोपण प्रसंगीं ईश्वराची प्रार्थना करणारा आणि ईश्वर स्वरूपीं असलेल्यां सुज्ञ मंडळीपुढें हा लेख नम्रपणें सादर करणारा,

आपला कृपाभिलाषी,

**गोविंद रंगराव अळेकर.**

नवी शुक्रवारी, नागपूर.

---

चैत्र शुद्ध १ शके १८४९ सवंत १९८३.

रोज रविवार तारीख ३ एप्रील १९२७.

# कर्मयोग दर्शन





लोकमान्य टिळक



विश्वमान्य गांधी

REFBK-0003282

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
सं. क्र. 3212
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)